<u>नियमित दिवाणी दावा नं. ०८/२०१५</u>
<u>(सचिन वि. कांतीलाल)</u>

## <u>निशाणी क्र. ५५ खालील आदेश</u>
## <u>(दिनांक ०६.०५.२०२२)</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी दाखल केला.

२. वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद चतुःसिमेअंतर्गत असलेले ५०६ चौ. मी. क्षेत्र दाव्याचा वाद विषय आहे. वादीच्या म्हणण्यानुसार सदरचे क्षेत्र गट क्र. ४२६ पैकी आहे. प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर व कारक ताकीदीसाठी दाखल केला. प्रतिवादीने त्यांची कैफियत दाखल केली. वादीचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने मंजुर केला. प्रतिवादीने दाखल केलेल्या कैफियत व ताकीद अर्जाच्या म्हणण्यात असे कथन केले की, गट क्र. ४२६ मध्ये पुर्व–पश्चिम कराड–तासगाव रस्त्याच्या दक्षिणेकडील अंगास गट क्र. ४२६ ची मिळकत शिल्लक नाही. गट क्र. ४२५ ची मिळकत खरेदी केल्याचे व त्यात बांधकाम करत असल्याचे प्रतिवादीने कैफियतीमध्ये कथन केले. गट क्र. ४२५ व ४२६ मधील हददीबाबत प्रतिवादी तक्रार करत आहे. सदर दोन गटांचा एकत्रीत असलेला नकाशा पाहता, सदर दोन गटांचे क्षेत्र तासगाव–कराड रस्त्याच्या दक्षिणेकडील अंगास शिल्लक असल्याचे दिसते. वादीच्या वकीलांनी कोणत्याही कारणासंदर्भात वादकथन न करता पुर्वी साधा कमिशनचा अर्ज दाखल केला होता. सदरील अर्ज न्यायालयाने नामंजुर केला. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीने क्षेत्राचा, चतुःसिमेचा व मोजमापाचा वाद उपस्थित केला आहे. त्यामुळे वादीच्या म्हणण्यानुसार सत्य परिस्थिती न्यायालयापुढे येण्यासाठी तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होणे गरजेचे आहे. वादीने गट क्र. ४२५ व ४२६ या मिळकतींची मोजणी करुन हदद कायम करण्याची विंनती केली. त्याचप्रमाणे परिच्छेद क्र. ६ मध्ये नमूद असलेल्या इतर बाबींबाबत कोर्ट कमिशनरला आदेशित करण्याची वादीने विनंती केली.

३. प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध दर्शवला. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार निशाणी क्र. २३ खाली वादीने कोर्ट कमिशनर नियुक्ती साठी अर्ज दिला होता. सदरील अर्जावर दुतर्फा सुनावणी घेवून न्यायालयाने तो फेटाळला. त्यामुळे पुन्हा त्याचप्रकारचा अर्ज कायदयाने देता येत नाही. प्रस्तुत वादमिळकती संदर्भात वादीने वि.दि.दा.क्र. १५१/२०१६ दाखल केला होता. सदर दाव्याच्या कामी वादीने निशाणी क्र. २९ खाली कमिशनचा अर्ज दिला होता. सदरील अर्जदेखील दुतर्फा चौकशी होवून नामंजुर करण्यात आला. प्रतिवादीने असादेखील आक्षेप नोंदवला की, प्रस्तुतचा अर्ज देवून वादीला पुरावा गोळा करता येणार नाही. कोर्ट कमिशनरचा वापर करुन वादी पुरावा गोळा करण्याच्या प्रयत्नात आहे. गट क्र. ४२५ व ४२६ मधील संपूर्ण मिळकती हया दावा मिळकती नाहीत त्यामुळे मोजणी मागण्याचा अधिकार वादीला नाही. वादीच्या पुर्वहक्कदारांनी वाणिज्य बिनशेती करताना त्याचा नकाशा तयार केला. असे असताना वादीची संपूर्ण गटाच्या मोजणीची मागणी निरर्थक आहे. गट क्र. ४२५ व ४२६ या मिळकतीमध्ये हददीबाबत वाद आहे अशी तक्रार वादीने वादपत्रात कुठेही उपस्थित केली नाही. वादीच्या ५०६ चौ.मी. क्षेत्राचा वेगळा वसला पडलेला नाही त्यामुळे मोजणीदारास मोजणी करणे अशक्य आहे. सरतेशेवटी, प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. वादींतर्फे विधिज्ञ श्री. डी. जी. गायकवाड यांनी युक्तिवाद केला. वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी हजर होण्यापुर्वी कोर्ट कमिशनचा अर्ज दिला होता व सदरचा अर्ज न्यायालयाने नामंजुर केला. त्यानंतर प्रतिवादीने कैफियत दाखल केली. कैफियतमध्ये प्रतिवादीने क्षेत्राचे अस्तित्व व परिस्थिती नाकारली. तसेच प्रतिवादीने चतुःसिमेचा वाद उपस्थित केला. विधिज्ञांनी असादेखील युक्तिवाद केला की, खरेदीपत्रामध्ये दक्षिण दिशेने गट क्र. ४२५ दाखविण्यात आला. पुर्व–पश्चिम असा रस्ता असल्यामुळे गट क्र. ४२५ व ४२६ चे दोन भाग झाले. निशाणी क्र. ३८/१ खाली दाखल असलेल्या टोच नकाशावरुन गट क्र. ४२५ व ४२६ चे दोन भाग झाल्याचे विधिज्ञांनी न्यायालयास सांगितले. विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार यापुर्वीचा कोर्ट कमिशनचा

अर्ज नामंजुर झाला तरीसुध्दा दुसरा अर्ज दाखल करण्यास कायदयाची बाधा नाही. गट क्र. ४२५ व ४२६ च्या चतुःसिमांचे निर्धारण होणे गरजेचे आहे. निशाणी क्र. ६५/१ खाली दाखल असलेल्या नकाशाकडे मा. विधिज्ञांनी न्यायालयाचे लक्ष वेधून सांगितले की, उत्तर दिशेला कराड–तासगाव रस्ता असून पुर्वेस व दक्षिणेस गट क्र. ४२५ ची मिळकत आहे. एकंदरित विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने वाद मिळकतीचे अस्तित्व नाकारुन चतुःसिमेचा वाद उपस्थित केला. त्यामुळे विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार मिळकतीचे ठिकाण निश्चित होणे गरजेचे आहे. सरतेशेवटी विधिज्ञांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. विधिज्ञांनी खालील न्यायानिवाडयांवर त्यांची भिस्त ठेवली.

1. **Smt. Shamlata Manohar Raut Vs. Vishweshwara Giripunje** reported in AIR 2008 Bom. 155.
2. **Subal Kumar Dey Vs. Purna Chandra Giri** reported in AIR 1989 Orissa 214.

५. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. जी. जाधव यांनी युक्तिवाद केला. विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार, वादीने त्यांची वादकथने स्वतः सिध्द करावी. प्रतिवादीने उपस्थित केलेल्या तक्रारींचा वादीला फायदा घेता येणार नाही. निशाणी क्र. २३ खाली वादीने कोर्ट कमिशनचा अर्ज दाखल केला होता. सदरील अर्ज न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे विधिज्ञांच्या म्हणण्यानुसार त्याच पध्दतीचा दुसरा अर्ज कायदयाने चालण्यास पात्र नाही. विधिज्ञांनी असादेखील युक्तिवाद केला की, वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने कैफियत देण्यापुर्वी त्यांनी निशाणी क्र. २३ चा अर्ज दिला होता व तो न्यायालयाने फेटाळला. निशाणी क्र. २३ च्या अर्जातील कथनांकडे न्यायालयाचे लक्ष वेधून विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने कैफियत दाखल केल्यानंतर सदरचा अर्ज वादीने दिला होता. सदरील अर्जावर दुतर्फा सुनावणी होवून न्यायालयाने तो फेटाळला. त्याचप्रमाणे वादीने वि.दि.दा.क्र. १५१/२०१६ मध्ये देखील कोर्ट कमिशनचा अर्ज दाखल केला होता. सदरील अर्ज देखील न्यायालयाने फेटाळला. विधिज्ञांनी असाही युक्तिवाद केला आहे की, वि.दि.दा.क्र. १५१/२०१६ मध्ये उत्तरेकडे ५०६ चौ.मी. क्षेत्र असल्याचे वादी कथन करतो

तर प्रस्तुतच्या दाव्यात ते क्षेत्र दक्षिणेकडे असल्याचे कथन करतो. वादीने अतिक्रमणाचे आरोप केले नाहीत किंवा चतुःसिमेच्या वादाची वादकथने केली नाहीत. गट क्र. ४२५ ही मिळकत दाव्याचा वाद विषय नाही त्यामुळे वादी म्हणत असल्याप्रमाणे आदेशित करता येणार नाही. एकंदरित विधिज्ञांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

६. प्रामुख्याने प्रतिवादीने असा आक्षेप नोंदवला की, प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही कारण याच प्रकारचा अर्ज वादीने निशाणी क्र. २३ खाली दाखल केला होता व तो न्यायालयाने नामंजुर केला. याउलट, वादीच्या म्हणण्यानुसार कोर्ट कमिशनच्या नियुक्तीसाठी नव्याने अर्ज दाखल करण्यास कायदयाची बाधा नाही. त्यामुळे निशाणी क्र. २३ चा अर्ज नामंजुर झाल्यानंतर पुन्हा नव्याने कोर्ट कमिशनचा अर्ज चालण्यास पात्र आहे किंवा कसे हे सर्वप्रथम तपासणे गरजेचे आहे.

७. संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी क्र. २३ खाली वादीने कोर्ट कमिशन नियुक्तीसाठी अर्ज दिला होता. या न्यायालयाच्या मा. पुर्वाधिकारी यांनी सदरचा अर्ज दिनांक १७.०९.२०१६ रोजी नामंजुर केला. प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये वादीने असे कथन केले की, प्रतिवादीचे म्हणणे येण्यापुर्वीच वादीच्या वकीलांनी कोणत्याही कारणासदंर्भात वादकथने न करता साधा कमिशनचा अर्ज दाखल केला होता. वादीच्या सदर कथनात तथ्य दिसून येत नाही कारण निशाणी क्र. २३ चा अर्ज हा दिनांक ११.०२.२०१५ रोजी दाखल करण्यात आला तर प्रतिवादीने त्यांची कैफियत / म्हणणे हे दिनांक ३०.०१.२०१५ रोजी दाखल केले. तसेच, निशाणी क्र. २३ च्या अर्जास प्रतिवादीने निशाणी क्र. २७ खाली त्यांचे म्हणणे दाखल केले. एकंदरित दुतर्फा सुनावणीअंती निशाणी क्र. २३ चा अर्ज निकाली करण्यात आला. निशाणी क्र. २३ मध्ये वादीने मोजणी का करावयाची आहे हेदेखील नमूद केले होते. त्यामुळे कोणत्याही कारणासंदर्भात वादकथने न करता आणि प्रतिवादीचे म्हणणे येण्यापुर्वी वादीच्या वकीलांनी साधा कमिशनचा अर्ज दाखल केला होता हे मान्य व कबुल करण्यासारखे नाही.

८. प्रतिवादीने यादी निशाणी क्र. ६२/१ खाली वि.दि.दा.क्र. १५१/२०१६ मधील निशाणी क्र. २९ च्या अर्जावरील आदेश दाखल केले. सदर प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा देखील प्रस्तुत वादीने दाखल केला होता. सदर दाव्यातील निशाणी क्र. २९ चा अर्जदेखील वादीने कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी दाखल केला होता. सदरचा अर्ज हा दिनांक ०५.०९.२०१८ रोजी नामंजुर झाला. एकंदरित, प्रस्तुत अर्जाच्या अगोदर दोन वेळेस वादीने कोर्ट कमिशनरच्या नियुक्तीसाठी अर्ज दिले होते व ते दोन्ही अर्ज न्यायालयाने नामंजुर केले.

९. प्रचलित न्यायतत्वानुसार एखादया विशिष्ट प्रकारचा अर्ज निकाली झाल्यानंतर त्याच प्रकारचा अर्ज त्याच दाव्यात नव्याने दाखल करता येत नाही. वादीच्या म्हणण्यानुसार कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी नव्याने अर्ज दाखल करण्यासाठी कायदयाची बाधा नाही आणि त्याबाबत त्यांनी **श्रीम. शामलता मनोहर राऊत वि. विश्वेश्वरा तुकाराम गिरीपुंजे** या न्यायनिवाडयावर त्यांची भिस्त ठेवली. सदर न्यायनिवाडयाचा मी काळजीपुर्वक अभ्यास केला असता असे दिसून येते की, सदरचा न्यायनिवाडा हा वादीच्या फायदयाचा नाही. सदर प्रकरणातील वादीने वादपत्रासोबत सेवानिवृत्त तलाठी यांनी बनवलेला वादपत्रनकाशा दाखल केला होता. वादमिळकत शास्त्रशुध्द पध्दतीने मोजण्यात आली नव्हती म्हणून मा. उच्च न्यायालय यांनी कनिष्ठ न्यायालयास मोजणीदार नेमणूक करण्याचे आदेश दिले होते. एकंदरित श्रीम. शामलता या न्यायनिवाडयात असे तत्व नाही की, नव्याने कोर्ट कमिशनचा अर्ज देण्यासाठी कायदयाची बाधा नाही. त्यामुळे मी आदरपुर्वक नमूद करु इच्छीतो की, श्रीम. शामलता या प्रकरणातील न्यायनिवाडा प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाही कारण सदर प्रकरणातील पक्षकाराने कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी अर्ज दिलेला नव्हता परंतु याउलट, प्रस्तुत दाव्यात निशाणी क्र. २३ चा अर्ज न्यायालयाने नामंजुर केला.

१०. याअगोदर सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील निशाणी क्र. २३ चा अर्ज आणि वि.दि.दा.क्र. १५१/२०१६ मधील निशाणी क्र. २९ चा अर्ज नामंजुर झालेला आहे. सदरचे दोन्ही अर्ज कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी होते. प्रचलित न्यायतत्वानुसार अगोदरचा

अर्ज नामंजुर झाल्यास त्याच प्रकारचा नव्याने अर्ज चालण्यास पात्र नाही. त्यामुळे एकंदरित असे दिसून येते की, प्रस्तुतचा अर्जदेखील कायदयाने चालण्यास पात्र नाही. मी आदरपुर्वक नमूद करु इच्छीतो की, **सुबल कुमार** या न्यायनिवाडयातील व प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांमध्ये भिन्नता असल्यामुळे सदरील न्यायनिवाडा प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाही. प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर बाबींवर निकाली होत आहे त्यामुळे मी स्पष्ट करु इच्छीतो की, या न्यायालयाने प्रकरणातील तथ्यांवर निरिक्षण नोंदवलेले नाही. एकंदरित प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही म्हणून नामंजुर होण्यालायक आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by PRASHANT VISHWANATH SURYAWANSHI
Date: 2022.05.06 18:04:06 +0530

पलूस.
दिनांक ०६.०५.२०२२.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पलूस.

---

I affirm that the contents of the PDF file judgment are same, word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shri. Ajinkya R. Edake. (L.G.). |
| Court Name | : | Shri. Prashant V. Suryavanshi<br>Civil Judge Junior Division &<br>Judicial Magistrate First Class,<br>Palus, Dist. Sangli. |
| Date of Typing | : | 06.05.2022. |
| Judgment signed<br>by Presiding Officer on | : | 06.05.2022. |
| Judgment uploaded on | : | 06.05.2022. |

---